Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Dr. T. M. Chougale**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/२०३ दि. २४/०९/२०२५

प्रती,
१. **मा. प्राचार्य,**
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२. **मा. अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,**
सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय :– अविष्कार संशोधन स्पर्धा २०२५–२०२६ विद्यार्थी नोंदणी लिंकबाबत....**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात अविष्कार संशोधन स्पर्धा २०२५ – २०२६ चे आयोजन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हा | आयोजक महविद्यालयाचे नाव | स्पर्धेची तारीख |
|---|---|---|---|
| १ | **कोल्हापूर** (यु.जी. लेवल) | जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी. | ०७/१०/२०२५ |
| २ | **सांगली** (यु.जी. लेवल) | श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सांगली | ०८/१०/२०२५ |
| ३ | **सातारा** (यु.जी. लेवल) | किसनवीर महाविद्यालय, वाई | १०/१०/२०२५ |
| **विद्यापीठस्तरिय अविष्कार संशोधन स्पर्धा** | | | |
| १ | इंग्रजी अधिविभाग, मराठी अधिविभाग, हिंदी अधिविभाग व विदेशी भाषा अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने | यु.जी. लेवल (जिल्हयातून निवड करण्यात आलेले) पी.पी.जी. लेवल | १३/१०/२०२५ |
| | | पी.जी. लेवल | १४/१०/२०२५ |

शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरिय अविष्कार संशोधन स्पर्धा २०२५–२०२६ च्या अनुषंगाने खालील बाबींची नोंद घेवून आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची स्पर्धेसाठी ऑनलाईन नोंदणी करावी.

१. जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धा प्रवेशिका भरणेबाबतची ऑनलाईन लिंक खालीलप्रमाणे आहे.

https://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login

२. सन २०२५–२०२६ जिल्हास्तरीय व विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी https://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login या लिंकवर क्लिक करावे व Online प्रवेशिका आपले महाविद्यालयास विद्यापीठाचे Affilation विभागाकडून देण्यात आलेल्या Login ID (विद्यापीठाने दिलेला ईमेल आयडी) व Passward चा वापर करुन पोर्टल Open करावे. त्यानंतर सदर पोर्टलच्या Home page वर असणाऱ्या Youth Festival/Avishkar या Icon ला क्लिक केल्यानंतर त्यामध्ये Avishkar Form ला क्लिक केल्यानंतर सदर अविष्कार संशोधन स्पर्धा Online प्रवेशिका भरणेचा फॉर्म Open होईल. सदरचा फॉर्म भरुन सबमिट या बटनवर क्लिक करुन सर्व विद्यार्थ्यांचे फॉर्म भरावेत व सर्व विद्यार्थ्यांचे नावे भरुन झाल्यानंतर Lock बटनवर क्लिक करुन सर्व विद्यार्थ्यांची माहिती Lock करावी. विद्यार्थ्यांची सर्व माहिती **Lock** केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

३. सदर **Online** प्रवेशिका शनिवार दि. ०५/१०/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भरावयाच्या आहेत. अंतिम मुदत संपलेनंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

४. महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या २९९९ च्या आत असेल तर खाली नमुद केल्याप्रमाणे नोंदणी करावी. त्यापेक्षा जास्त नोंदणी महाविद्यालयांनी करु नये.

**UG – 12, PG – 12, PPG – 06**

५. महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या २९९९ च्या पेक्षा जास्त असेल तर खाली नमुद केल्याप्रमाणे नोंदणी करावी. त्यापेक्षा जास्त नोंदणी महाविद्यालयांनी करु नये.

**UG – 18, PG – 18, PPG – 08**

६. सदर फॉर्ममध्ये एका **Participating Discipline** मध्ये जास्तीत जास्त ४ प्रवेशिका भरण्यात याव्यात त्यापेक्षा जास्त भरु नये.

७. अविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये प्रकल्प सादरीकरणावेळी एकच विद्यार्थी सादरीकरण करु शकेल साथीदार विद्यार्थी घेता येणार नाही.

तरी कृपया वरील बाबींची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

प्र.संचालक
विद्यार्थी विकास

सोबत :

१. अविष्कार संशोधन स्पर्धेची सर्वसाधारण नियमावली.

२. स्पर्धे ठिकाणी सादर करावयाची विद्यार्थ्यांच्या कागदपत्राची यादी.